Lalita Gandbhir
65 Oxford Rd.
Newton, MA 02459
lalitagandbhir@hotmail.com
© Lalita Gandbhir

# प्रवासरंग

मला वेगवेगळ्या देशात प्रवास करून निसर्गसौंदर्याने नटलेला प्रदेश, कलाकुसरीने सजवलेल्या इमारती, प्रसिद्ध कलाकारांच्या शिल्पकृती व त्यांनी रंगवलेली चित्रं बघण्याची हौस आहे. अशा प्रत्येक प्रवासात काहीतरी अनपेक्षित घटना घडते व मनात ठसा उठवून जाते. मी जे काही बघायला गेले होते त्यापेक्षा ती घटनाच माझ्या लक्षात राहते. अशा काही घटनांबद्दल मी या लेखात लिहीणार आहे.

शरद गंडभीर व मी पॅरिसला गेलो होतो. रात्री परत हॉटेलात पोचताना वाट चुकलो व लाल बत्त्यांच्या रस्त्यावर पोहोचलो. त्या रस्त्यात रात्री उजेडच उजेड होता. दोन्ही बाजूला दोन ते तीन मजली घरं होती. रस्त्यावरच्या प्रकाशापेक्षाही त्या घरांच्या खिडक्यांत जास्त झगझगीत उजेड होता. काही खिडक्यांभवती रंगीबेरंगी दिव्यांची रोषणाई केली होती. ठिकठिकाणी संगीताचे व वाद्यवादनाचे आवाज निनादत होते. अनेक खिडक्यांत उत्तान, भडक कपडे घातलेल्या स्त्रिया उभ्या होत्या. काही तरी मोठ्ठी चूक झालीय हे आमच्या लगेच लक्षात आलं. आम्ही तोंड वळवून उलट्या दिशेला जाऊ लागतो न लागतो तोच तीन बायका धावत आल्या. त्यांनी शरदचे हात पकडले व फ्रेंचमधे (अर्थात आम्हाला न समजणाऱ्या भाषेत) बडबडत शरदला तीन दिशांनी खेचायला सुरवात केली. 'खरंच त्यांनी शरदला पकडून नेलं तर माझं काय होणार?' ह्या भीतीने मला ग्रासलं व मी शरदला कमरेला धरून चवथ्या दिशेत खेचायला लागले. (ह्या सगळ्या भानगडीत शरद काय करत होता हे माझ्या लक्षात नाही.) ही रस्सीखेच दोनतीन मिनिटं चालू राहिली.

बाजूला अर्ध्या बाह्यांचे टी शर्ट व तोकडी शॉर्टस् घातलेले दोन पुरुष एका बाकड्यावर बसले होते. त्यांनी थोडा वेळ ही गंमत बघितली. मग त्यांच्यातला एक उठून त्या बायकांना फ्रेंचमधे काहीतरी म्हणाला. त्या बायकांनी शरदला सोडून दिलं. मीच एकटी त्याला त्या रस्त्यापासून दूर खेचत राहिले. (थोडक्यात वेश्यांबरोबर माझी माझ्या नवऱ्याला जिंकून घेण्यासाठी स्पर्धा चालली होती.)

त्या भागापासून दूर जाताच शरद व मी हसायला सुरवात केली. खरं सांगायचं तर माझी छाती तेव्हाही धडधडत होती.

मग आम्हाला त्या भागाला 'पिगॅल' म्हणतात असं कळलं. ते शरदला (का मला) संकटातून सोडवणारे पुरुष बहुधा 'पिंपस्' असावेत असा आम्ही अंदाज केला. माझ्या मराठीतल्या किंचाळण्यावरून त्यांनी 'आम्ही बहुतेक टूरिस्ट असून चुकून त्या रस्त्यावर पोचलो' असा अंदाज केला असावा.

पॅरिसचं नाव काढलं की ती रात्र माझ्या डोळ्यासमोर नाचू लागते.

ब्राझिलमधे इग्वासू नावाचा अप्रतिम व प्रचंड धबधबा आहे. तो बघायला आम्ही गेलो होतो. धबधब्याजवळ टूरिस्टस् साठी सुंदर रिझॉर्ट आहे. त्या रिझॉर्टमधल्या रेस्टॉरंटमध्ये संध्याकाळी जेवायला आम्ही गेलो. रेस्टॉरंटभवती सुंदर बगिचा आहे. त्यात जगभरचे लोक विखुरलेले होते. बुरखाधारी व साडी नेसलेल्या बायका, जेमतेम कपडे घातलेल्या तरुणी, सुटाबुटातले रुबाबदार तरुण, धबधबा बघायला आलेल्या वृद्धांचा थवा- काही बगिचात टेबलांवर जेवत होते तर काही नुसतेच हिंडत होते.

रेस्टॉरंटच्या दुसऱ्या मजल्यावरून म्युझिकचा आवाज येत होता. पण त्याकडे कुणाचं लक्ष नव्हतं. दुसऱ्या मजल्यावर एक हॉल होता. त्या हॉलला तीन मोठ्ठे दरवाजे होते. हॉलच्या समोर एक अर्धवर्तुळाकार टेरेस होती. त्या टेरेसमधे ते दरवाजे उघडत होते. टेरेसच्या कठड्यालगत रंगीबेरंगी फुलांच्या कुंड्या होत्या. सूर्य मावळला. सगळीकडे संधीप्रकाश पडला. अकस्मात बगिचातल्या मशाली पेटल्या. टेरेसच्या कठड्याला लावलेल्या लाल निळ्या हिरव्या दिव्यांच्या माळा झगमगू लागल्या. टेरेसमधे उघडणारे दरवाजे बंद होते. ते पांढरा सूट, लाल टाय व पांढरे हातमोजे असा पोषाख केलेल्या उंच दरवानांनी उघडले. मग मधल्या दरवाजातून काळी पँट, लाल कोट घातलेले व काळा बो टाय लावलेले बँडवाले ड्रमस् व इतर म्युझिकल इंस्ट्रुमेंटस् घेऊन बँड वाजवत बाहेर आले व ओळीने मधल्या दरवाजासमोर उभे राहिले. व दोन दरवान बाजूच्या दरवाजाशेजारी उभे राहिले.

एव्हाना बगिचातला कोलाहल शमला होता. सगळे टेरेसकडे आ वासून बघत होते. मुलंही दंगा करायला विसरली होती.

आता बाजूच्या दरवाजातून नृत्य करणारी जोडपी बाहेर पडू लागली. सर्व पुरुषांनी पांढरा सूट घातला होता व काळा बो टाय लावला होता. बायकांनी मध्ययुगात घालत असत तसे बिनबाह्यांचे, अर्धी छाती उघडे टाकणारे, कमरेला घट्ट बसलेले व पायाशी फुगारलेले रंगीबेरंगी गाऊन घातले होते. केसांच्या सुरळ्या केल्या होत्या. काहींनी केस डोक्यावर (नारदमुनीसारखे) बांधले होते.

बघता बघता टेरेस पूर्ण भरली. चंद्र उगवला. बॅंडच्या म्युझिकच्या तालात ती जोडपी जुन्या सिनेमातल्या नटनट्यांसारखी नृत्य करीत होती. मला कुठल्या तरी सिनेमाचं शूटिंग चाललंय, टाईम कॅपसुलमधे बसून मी मध्ययुगात पोहोचलेय किंवा मी स्वप्नात आहे असं वाटू लागलं. (The scene was surreal).

अकस्मात आली तशीच ती जोडपी बाजूच्या दरवाजातून आत जाऊ लागली. एक एक करून ती सर्व जोडपी नाचत नाचत अंतर्धान पावली. त्यांच्या मागे बॅंड आत गेला. सर्वात शेवटी दरवान आत गेले. दरवाजे बंद झाले. मग दिवे विझले.

म्युझिकल संपलं होतं.

मशालींच्या प्रकाशात भारून ते दृश्य बघणारा जनसमूह दोन तीन मिनिटं स्तब्धच राहिला. त्यांची सर्वांची माझ्यासारखीच अवस्था झाली असावी. मग थोड्या टाळ्या वाजल्या. हळूहळू कोलाहल सुरू झाला.

दुसऱ्या दिवशी मला 'त्या हॉलमधे कुणा श्रीमंताच्या मुलीचं लग्न होतं' असा शोध लागला.

आता इग्वासू फॉलचं नाव काढलं की मला तो surreal scene दिसू लागतो.

आयुष्यात दोनदाच मला चित्रविचित्र भास झाले.

एकदा मी चिचनिझा या मेक्सिकोमधल्या ऐतिहासिक ठिकाणी  गेले असताना व एकदा औरंगाबादला अजंठा एलोराच्या लेण्यांत.

चिचनिझला एक मोठ्ठा दगडी पिरॅमिड आहे. त्याला समोरून अरुंद पायऱ्या आहेत. वरती पोचल्यावर चौथरा आहे. त्या चौथऱ्यावर अॅझटेक पुजारी नरबळी देत असत. छातीतून हृदय कापून काढून ते धडधडतं हृदय सूर्याला दाखविण्याची त्यांची पद्धत होती. जवळच फुटबॉलचं असतं तसं मैदान आहे. तिथे कवट्या बॉलसारख्या वापरून दोन टीमस् फुटबॉलसारखा खेळ खेळत असत. हरणाऱ्या टीमला अर्थात मृत्यूची सजा होई.

पिरॅमिडमधे अजून खोदलेला अरुंद उंच पायऱ्यांचा अंधारा जिना आहे. त्या जिन्यावरून नरबलीला चौथऱ्याकडे नेत असत.

'त्या जिन्यावर चढण्याचा प्रयत्न फक्त शूरवीरांनीच करावा' असं गाईडने सांगितलं. 'मी शूरवीरात जमा होणारी नाही' असं माझं मत असतानाही मी तो जिना चढण्याचं ठरवलं.

तोपर्यंत दुपार झाली होती. डोक्यावर सूर्य तळपत होता. मी जिना चढू लागले तेव्हा बाजूच्या दगडी भिंतीतून गरम झळा येत होत्या. अर्ध्यावर पोचले तेव्हा घामाने भिजले. चक्कर येऊ लागली आणि काहीतरी भास होऊ लागले. किंचाळ्या ऐकू येऊ लागल्या. जिन्यावरून रक्त वाहत आहे असं वाटू लागलं. समोर मशाल घेऊन माणसं चालली आहेत असाही भास झाला.

तेव्हा मी परत फिरले. मला बरीच सोबत होती. इतरही डरपोक स्त्रीपुरुष परत फिरले होते. त्या पोखरलेल्या डोंगरातून बाहेर पडेपर्यंत मला जबरदस्त चक्कर येऊ लागली होती. बाहेर पडून मी दोन बाटल्या पाणी प्याले.

त्या रात्री झोपेतही मला स्वप्नात चित्रविचित्र क्रूर दृश्ये दिसत होती.

औरंगाबादच्या लेण्यात मी पिरॅमिडच्या जिन्यावर चढण्यासारखा मूर्खपणा केला नव्हता. मी चांगल्या मोठ्या उघड्या दगडी भिंतीच्या पटांगणात होते. पण तशीच दुपार होती. सूर्य तळपत होता. भयंकर उकडत होतं. आमच्या गाईडने दगडी खडकात कोरलेली पार्वती दाखवली तेव्हा तिच्या पापण्यांची उघडझाप होतेय असं मला वाटलं. मग एक दगडी साप सळसळला आणि हत्तीची सोंड हलली.

मी परत दोन बाटल्या पाणी प्याले व सावलीत गेले.

अति गरमीत घामामुळे शरीरातील सॉल्ट (electrolytes) व पाणी कमी होतं, मेंदूवर त्या डीहायड्रेशनचा दुष्परिणाम होतो व चित्रविचित्र भास होतात असा ह्या अलौकिक अनुभवांचा खुलासा मी माझ्या समाधानासाठी केला.

सोबतीला भूत, दैवी साक्षात्कार, spiritual experience ह्या धर्तीचे खुलासेही कुणी देईल.

पण हे असं घडलं मात्र खरं.

मेक्सिको व अजंठा एलोराचं नाव काढलं की मला ते भास आठवतात.

एकदा भारतात मी माझ्या मुलींसह दक्षिण भारताच्या देवळांची टूर केली. तिथे एका देवळात फक्त हिंदूनाच प्रवेश देतात. 'मी हिंदू' हे देवळाच्या पुजाऱ्याने मान्य केलं पण 'माझी मुलगी हिंदू नाही' असं तो म्हणू लागला. मी त्याच्याशी हुज्जत घालत बसले, "तिचे वडील हिंदू आहेत, मी तिची आई हिंदू आहे" इ.इ.

आमच्या बसमधे एक बंगाली प्रवासी होता. तो पुजाऱ्यामागून मला खाणाखुणा  करत होता. माझ्या डोक्यात काही प्रकाश पडत नव्हता. त्याने स्वतःच्या खिशातून दहा रुपयांची नोट काढली आणि त्या पुजाऱ्या शेजारच्या माणसाला दिली. माझी मुलगी एकदम हिंदू झाली. प्रश्न मिटला.

मी त्याची दहाची नोट परत करायला गेले तेव्हा तो मला वैतागून म्हणाला, "You live in a foreign country and forget our simple Indian ways." मला काय म्हणावं तेच समजेना. मी फक्त हसले आणि simple Indian way चं पालन करुन काही लागलं की नोटा काढायला सुरवात केली.

हॉटेलच्या खोलीतली चादर बदलून स्वच्छ चादर हवी – दहा रुपये, देवळाच्या गाभाऱ्यात जायचंय - वीस रुपये इ.इ.

देव मला लाच देण्याचं दुष्कृत्य केलं याची क्षमा करेल अशी आशा करते.

हवाईत बिग आयलंडमधे मी व माझी मुलगी व्होल्कॅनिक क्रेटरस् बघायला गेलो. क्रेटर खूप खोल होतं. रस्त्यावरून क्रेटरमधे वाकून बघण्यासाठी अर्धा मैल गवतातून पायवाट होती. ठिकठिकाणी 'फ्लॅश फ्लड डेंजर झोन' अशा धोक्याच्या सूचनांच्या पाटया लावल्या होत्या. आकाशात ढग नव्हते. मी पाट्यांकडे दुर्लक्ष केलं. आम्ही दोघी रमतगमत क्रेटरपर्यंत पोचलो. आत डोकावून पाहिलं व परत फिरलो. अकस्मात ढग आले. धो धो पाऊस कोसळू लागला. बघताबघता पाणी गुडघ्यापर्यंत पोचलं. पाण्याला प्रचंड ओढ होती. ती आम्हाला क्रेटरच्या दिशेने खेचत होती. आम्ही दोघींनी एकमेकीला घट्ट धरलं व सगळी शक्ती एकवटून खेचत्या पाण्याच्या ओढीविरुद्ध दिशेने रस्त्यापर्यंत पोचलो. रस्ता उंचवट्यावर होता. त्यावरही पाऊल बुडेल एव्हढं पाणी होतं.

वेळ आली होती पण काळ आला नव्हता इ.इ. हवाई पुराण. आता हवाईचं नाव काढलं की मला फ्लॅश फ्लड आठवतो.

मी पंधरा सोळा वर्षांची होते तेव्हा आजीबरोबर कुंभमेळ्याला गेले होते. तो कुंभमेळा नाशिकला होता. प्रत्यक्ष देवळं वगैरे मला नीट आठवत नाहीत. पण नदीकाठची रात्र तेव्हढी आठवते. नदीच्या दोन्ही बाजूला दगडी प्रशस्त घाट बांधलेले होते. दोन्ही किनाऱ्यांवर देवळांच्या रांगा होत्या. रात्री आम्ही तिथे पोचलो तेव्हा देवळात पूजा, आरत्या व मंत्रपठन चाललं होतं. वातावरणात फुलांचा, कापराचा मंद वास दरवळत होता. तसंच आरत्यांचे, मंत्रपठनाचे व घंटांचे संगीतमय सूर निनादत होते. स्त्रीपुरुष छोट्या दिवल्या पेटवून नदीत सोडत होते. अशा अनेक दिवल्या आम्ही उभे होतो तिथे वाहत येत होत्या. परिणामी दिवल्या बराच वेळ तरंगत राहत होत्या. हळूहळू भक्तगणांची व दिवल्यांची संख्या वाढत गेली. नदीचं पूर्ण पात्र दिवल्यांनी भरलं व दिवल्यांच्या स्निग्ध जादूई प्रकाशाने आसमंत उजळून गेलं. आरतीचा घोष, कापूर व फुलांचे सुवास, नदीवरचा तरंगता प्रकाश, घंटांचे निनाद ह्या मिश्रणाने वातावरणात आगळाच रंग भरला होता. मला तो नदीकिनारा सोडून जाववेना.

मी विचार करते तेव्हा मला ते जादूई वातावरण आता निर्माण करणं का अशक्य आहे हे समजतं.

तेव्हा लाउडस्पीकर नव्हते, भगभगते ट्यूबलाइटस् नव्हते, वाहनांची गर्दी नव्हती. Commercializing अगदी कमी प्रमाणात होतं.

आजीसाठी म्हणून केलेल्या त्याप्रवासात मला ती रात्र भेट म्हणून मिळाली व अविस्मरणीय झाली.

तो खरा spiritual experience!

आता मी प्रवास करते तेव्हा आगळंच काही घडेल अशी अपेक्षा ठेवते. पण ते घडतंच असं नाही.

ते प्राक्तनात असावं लागत. म्हणूनच फार गोड वाटतं.